MHKO100002972010

**नियमीत दिवाणी दावा क्र. ९७/२०१०**

तानाजी गोरुले.
//वि//
सिलेमान कुंदरगी वगैरे.

**निशाणी क्र.९६ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींतर्फे सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केला आहे. सदरचा दावा चौकशीवर असताना प्रतिवादी क्र.३ मयत झाली व तिचे वारस अभिलेखावर आणणेसाठी अर्ज दाखल केला असता प्रतिवादी क्र.३ हिचे वारसांपैकी प्रतिवादी क्र.३क/३ हिचे नांव सरिता असे नजरचुकीने नमुद झालेले आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.३क/३ हिचे नांवातील 'सरिता' या नांवास काट मारुन त्याऐवजी 'सविता' असे नमुद करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असुन सदर दुरुस्तीमुळे दावेचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही. सबब, वादी यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर हरकत नोंदविली व असे कथन केले की, वादी यांना प्रतिवादी क्र.३क/३ हिचे नांवाची माहिती असताना देखील वादींनी केवळ काम प्रलंबीत करणेचे हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब, प्रतिवादी यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.३क/३ हिचे नांव सरिता असे नजरचुकीने नमुद झालेले आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.३क/३ हिचे नांवातील 'सरिता' या नांवास काट मारुन त्याऐवजी 'सविता' अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तरी दाव्याचे स्वरुप पाहता वादींनी मागणी केलेप्रमाणे दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान

होणार नाही. याऊलट, दावा हा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, मुळ दाव्यात कोणतीही दुरुस्ती नसल्याने व केवळ नांवामध्ये दुरुस्ती असल्यामुळे मुळ दाव्यात कोणतेही बदल होत नसल्याने दाव्याचे स्वरुप बदलणारे नाही. तसेच, प्रस्तुतचा दावा हा प्राथमीक स्थितीत आहे. दाव्याची चौकशी अद्याप सुरु झालेली नाही, त्यामुळे आदेश ६, नियम १७ च्या निर्बंधाची बाधा प्रस्तावित दुरुस्तीस येत नाही. सदरची दुरुस्ती दाव्याच्या प्राथमीक स्थितीमध्ये मागितलेली असल्यामुळे ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.09.30 17:45:07 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ३०/०९/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 30/09/2023 |
| Order signed by P.O. on | 30/09/2023 |
| Order uploaded on | 30/09/2023 |